महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**वाणिज्य विभाग, प्रकाशगड-५ वा मजला अनंत कान्केकर मार्ग,**
**बांद्रा (पूर्व)**, मुंबई ४०० ०५१. फोन नं. २६४७२६४५ (का) २६४७४२११

---

**पी आर- ३/कृषी/३२८३७** दिनांक :१९.०८.२००७

**वाणिज्य परिपत्रक क्र. ५९**

**विषय** : कृषीपंपासाठी तात्पुरत्या वीजपुरवठयाचे दर कमी होणेबाबत.
**संदर्भ** : शासन पत्र क्र. व्हीआयपी- २००७/२०१/ऊर्जा-५ दि. २७.६.०७ अन्वये प्राप्त झालेले श्री. दिलीपराव शंकरराव बनकर, विधानसभा सदस्य, निफाड यांचे मा. मुख्यमंत्र्यांना दिलेले निवेदन दिनांक १९.१.२००७.

-----------------------

मा. विज नियामक आयोगाने त्यांचे आदेश दि. १८.५.२००७ अन्वये नविन विज दर अंमलात आणले त्यामध्ये कृषीपंपाकरिता रु १.१० प्रति युनिट हा दर कायम ठेवण्यात आलेला आहे.

सदर आदेशात लघुदाब-७ तात्पुरता पुरवठा या प्रवर्गात १) धार्मिक कारणांसाठी तात्पुरता वीज पुरवठा घेण्याकरिता रु. २ प्रति युनिट व २) इतर कारणांकरिता तात्पुरता वीज पुरवठयाकरीता रु.१०.५० प्रति युनिट निश्चित करण्यात आलेले असून त्यामध्ये बांधकाम, प्रदर्शने, सर्कस इ. चा समावेश करण्यात आलेला आहे. सदर प्रवर्गामध्ये कृषीपंप वा तत्सम कारणांकरिताच्या तात्पुरत्या वीजपुरवठयाचे प्रयोजन करण्यात आलेले नाही.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम, २००५ च्या कलम ६.६ मधे असे नमुद करण्यात आले आहे कि, " वितरण परवानाधारकास तीस दिवसांची सूचना देऊन ग्राहक करार संपुष्टात आणु शकेल. "

सदर कलमानुसार कुठल्याहि वर्गवारीतील वीज ग्राहक ३०दिवसांची लेखी नोटीस देऊन वीज पुरवठा कायमचा खंडीत करु शकतो.

सदर कलमाचा आधार घेऊन कृषी ग्राहकाला वाणिज्य परिपत्रक क्र. २१ दि. ६.१२.२००५ अन्वये तात्पुरता विज पुरवठा न देता कायमचा वीज पुरवठा दिला जाऊ शकतो. सबब वाणिज्य परिपत्रक क्र. २१ दि. ६.१२.२००५ हे रद्द करण्याकरीता सक्षम अधिका-यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी वाणिज्य परिपत्रक क्र. २१ दि. ६.१२.२००५ हे रद्द समजण्यात येऊन तात्पुरत्या कृषी पंपाकरिता वीज पुरवठ्याची मागणी करीत असलेल्या ग्राहकांना अस्तित्वात असलेल्या सेवा जोडणी नियमांप्रमाणे कायमचा वीज पुरवठा देऊन आयोगाने निश्चित केलेले दर देयकात लावण्यात यावे.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत रवाना :**
**मुख्य अभियंता, सर्व परिमंडळे, म.रा.वि.वि.कं. मर्यादित.**
**अधीक्षक अभियंता, सर्व मंडळ कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित.**
**कार्यकारी अभियंता, सर्व मंडळ कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित.**